| MHSN060003522024 | R.C.S./43/2024<br>Shankar Babu Ingole Ingvale Thr Legal Heir Vs. Sarjerao Mukinda Bisure |
|---|---|

# निशाणी २४ व २५ वरील संयुक्त आदेश

प्रस्तुतचा अर्ज यातील वादी यांनी आजरोजी प्रकरण सुचीपटलावर घेणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीतर्फे वकिल श्री. एस. एस. पाटील यांनी युक्तीवाद केला. वादीतर्फे वकिलांनी युक्तीवाद केला की, वादी यास दि. ०६.०८.२०२५ रोजी मंडल अधिकारी, आरग यांनी तहसिलदार यांचेकडील निकालाची अंमलबजावणी करीता नोटीस दिलेली आहे. अशा स्थितीत तहसिलदार यांनी दिलेल्या आदेशाने रस्ता पूर्ण झालेस वादीच्या पिकांचे तसेच ब–याच वर्षापूर्वीच्या झाडांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरकामी मंडळ अधिकारी आरग यांचेकडील प्रस्तावित कार्यवाही तहकूब होऊन मिळावी म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच सदर दाव्याचे कामी तातडीने अंतरिम अर्जावर चौकशी होणे गरजेचे असल्याने सदरचे प्रकरण हे अलिकडच्या तारखेस नेमणेविषयी विनंती केली आहे. अभिलेखाचे अवलोकन केले यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द हक्कज्ञापनकरीता तसेच कायम मनाईकरीता दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी यातील प्रतिवादी हे हजर झाले असून त्यांनी आपली दावेस कैफियत दाखल केलेली आहे. सदरचा दावा हा निशाणी ५ तुर्तातुर्त मनाई अर्जाच्या चौकशीसाठी प्रलंबित आहे. यातील वादी यांच्या कथनाप्रमाणे मंडळ अधिकारी, आरग यांनी तहसिलदार यांनी दिलेल्या निकालाप्रमाणे दिनांक १८.०८.२०२५ रोजी कार्यवाही करीत असलेबाबत नोटीस दिलेली आहे. सदर अर्जाचे कामी कोणताही आदेश पारीत करण्यापूर्वी प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक असे वाटते. तसेच मंडळ अधिकारी यांनी दिलेल्या नोटीशीप्रमाणे तहसिलदार यांच्या आदेशाची अंमलबजावणी ही दिनांक १८.०८.२०२५ रोजी करणार असल्याने सदरचे प्रकरण हे वादीच्या विनंतीप्रमाणे अलिकडच्या तारखेस नेमणेत येते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. यातील प्रतिवादी यांना त्यांचेविरुध्द तहकुबीचा आदेश का पारीत करणेत येऊ नये याची कारणे दाखवा नोटीस काढावी.

२. सदरचे प्रकरण हे अलिकडच्या तारखेस म्हणजेच दिनांक ११.०८.२०२५ रोजी नेमण्यात येते.

२. सदरची नोटीस प्रतिवादींचे वकिलांवर बजावणीस परवानगी देणेत येते.

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.08.07 17:57:56 +0530

(अनिरुध्द एस. राणे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

ठिकाण –मिरज.
दिनांक –०७.०८..२०२५.

<u>**C E R T I F I C A T E**</u>

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana | | |
| Name of Court | :- | Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. | | |
| Date of decision / typed | :- | 07 | 08 | 2025 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 07 | 08 | 2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 07 | 08 | 2025 |